**झाडू-४ (लहान आकाराचा झाडू)**

**चित्र पाहण्याकरता येथे क्लिक करा- झाडू-४ (लहान आकाराचा झाडू)**

**नोंदीत दिलेल्या पर्यायी शब्दांचा क्रम हा त्यांच्या एकूण सर्वेक्षणातील वारंवारितेनुसार दिलेला आहे याची नोंद घ्यावी.**

'जाते स्वच्छ करण्यासाठी तसेच देव्हाऱ्यात वापरला जाणारा लहान आकाराचा झाडू' या संकल्पनेसाठी महाराष्ट्रात आढळणारे शाब्दिक वैविध्य पुढीलप्रमाणे.

सदर संकल्पनेकरता फडा, फडूली, फळा, छोटा फडा, फडली, लहान फळा, फडी, फडे, फरका, ज़ाडु, झाडू, बारका झाडू, झाडनी, मोलझाडू, मुळाची झाडने, पिटझाडणी, लकझाडणी, झाळंनी, झान्नी, छोटी झाडणी, चौराची झारू, झाडणा, बारकी झारू, छोटा झाडू, झाडूली, कुंच़ला, कुच्या, कुची, कुस्सा, कुचा, कुंचली, कुशी, किशी, साळूता, साउता, साळता, पिठाचा साळूता, साळाती, साळोता, साळूती, सळातो, सलाता, लहान साळूता, केरसुनी, मोलाची केरसुनी, शिरय, शिराव, बारीक शिराव, शिरा, शिराऊ, शिराई, शिरावी, मांगाची शिराव, बेरी, बायरा, भायडी, वाहरी, पिटभरी, फुलभारी, बाहरी, बुडुख, बुडची, बुडखा, बुळूख, बुडुक, बुरकुंड, बुरखंड, बच, शिरांचा बच्चा, बच्चा, मुडगा, मुगडे, मुरगुडा, मुडगान, पिसोंडी, पिसुनं, पिसुन्द्री, पिसोळी, पिटोळी, लक्ष्मी, बुन्डात, बुंडी, पिल्ल, मयेर, मोयाळा, मोया, मायारू, वरवनी, मोलाची वडवन, वढवन, वरवन, बुचाटना, बुचट, मोळ, बोळ, मोल, मोवळा, सराटा, ब्रश, बरस, पोचारा, कैसर, कसुर, बारकी, हालती, हालता, हारतो, सोडन, सोडान, सारन, सान, खुटारो, खुट्टा, नेवाळ, नेवाळी, सुकली, पोतनी, बासोर, बासवरो, बरस, बाळनी, गोंडा, मुठाम्बा, शिपली, फाटकनी, मच्चर, घोळ, सायाळू, पालूक, ठोपूल, बुळूक, चावड, झाटकी, झटकनी, लौची, खाजरी, सिंधी, इत्यादी. शब्दवैवविध्य आढळून येते.

याचा आकार नेहमीच्या झाडूपेक्षा लहान असल्यामुळे लहान, बारीक, छोटा ही विशेषणे सदर संकल्पनेकरता वापरलेली दिसतात.

ह्या सामग्रीचे अधिकार क्रिएटिव्ह कॉमन्स संस्थेच्या श्रेयनिर्देशन-समवितरण ४.० ह्या परवान्याअंतर्गत मुक्त करण्यात येत आहेत.
परवान्याच्या मजकुरासाठी पुढील दुवा पाहता येईल. http://creativecommons.org/licenses/by-nc-sa/4.0/.